१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

जळगाव ■ अंक – २४८ ■ बुधवार, दि.१७ जुलै २०२४ संपादिका : सौ. शांता वाणी पाने ६ ■ किंमत ३ रु. lokshahilive@gmail.com






## विठुमाऊली तू माऊली जगाची, माऊलीत मुर्ति विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा!

**सोने-चांदी**

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : ७४,३४०
- **चांदी** (प्रति १ किलो): ९३,९१०

**तापमान**

- **कमाल** : ३७ अंश सेल्सिअस
- **किमान** : २० अंश सेल्सिअस

**महत्वाचे**

### आज पिंप्राळा रथोत्सव

**जळगाव :** पिंप्राळा परिसरातील श्री विठ्ठल मंदिर संस्थानतर्फे आषाढी एकादशीनिमित्त आज बुधवारी रथाची भव्य दिव्या अशी मिरवणूक निघेल. यंदा रथाचे १४९ वे वर्ष आहे. रथाला पानाफुलांनी सजविण्यात आले होते. आकर्षक दिव्यांची रोषणाई रथावर करण्यात आली असून रथ पाहण्यासाठी पिंप्राळ्यातील नागरिकांकडे बाहेरगावावरून नातेवाईक आले आहेत.

श्री विठ्ठल मंदिरामध्ये पहाटे पाचला विठ्ठल-रूखुमाई यांचा महाअभिषेक व पूजन होईल. सकाळी सातला वाणी समाजातर्फे अभिषेक पूजन नंतर रथावर विराजमान होणारी राधाकृष्णाची मूर्ती, अर्जुन (सारथी), घोडे, गरुड मूर्ती व हनुमान मूर्तींची विधिवत पूजा करण्यात येईल. भजनी मंडळातर्फे मंदिरामध्ये टाळ व मृदंगाच्या गजरात अभंग, गवळणी व भजने म्हणत दुपारी साडेबाराला मंत्रोच्चारात रथाची महापूजा करण्यात येईल. महाआरतीनंतर 'जानकाबाई की जय'च्या जय घोषात उपस्थित मान्यवर मंडळी व भक्तगण दोराने रथ ओढण्याचा आनंद लुटत यात्रेला सुरवात होईल.


## आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पंढरपूर** प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे १६ व १७ जुलै २०२४ रोजी पंढरपूर जिल्हा सोलापूर दौऱ्यावर आहेत. आषाढी एकादशीच्या निमित्तानं विठ्ठल मंदिरात होत असलेल्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री सहपरिवार पंढरपुरात दाखल झाले आहेत. दरम्यान, दोन दिवसात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्यासोबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अन्य मंत्री उपस्थित राहणार आहेत. आज बुधवार १७ जुलै रोजी मध्यरात्री २.२० वा. शासकीय विश्रामगृह येथून मोटारीने श्री विठ्ठल रखुमाई मंदिराकडे प्रयाण व आषाढी यात्रा २०२४ श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा. पहाटे ४.३० वा. देव वृक्ष सुवर्णपिंपळ बीज प्रसादाचे प्रतिनिधीक स्वरूपात वारकऱ्यांना वाटप अजान रुक्ष लोकार्पण व माहितीपत्रकाचे



विमोचन कार्यक्रम. पहाटे ४.४५ वा. मोटारीने शासकीय विश्रामगृहकडे प्रयाण. पहाटे ५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव . सकाळी ९ वाजता सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी भेटीगाठीसाठी राखीव. सकाळी ९.३० वा. मोटारीने चंद्रभागा बस स्थानकाकडे प्रयाण सकाळी १० वा. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रभागा बस स्थानक व यात्री निवास इमारत लोकार्पण सोहळा या कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ चंद्रभागा बस स्थानक. सकाळी १०.३० वा. तुळशी वृंदावन लोकार्पण सोहळ्याला उपस्थिती. सकाळी १०.४५ वा. राजश्री छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवन भूमिपूजन कार्यक्रम उपस्थिती. स्थळ –श्री संत गजानन महाराज संस्थान, स. ११ वा. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान राज्यस्तर अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे भूमिपूजन. स्थळ– लिंक रोड कर्मयोगी शाळेकडे जाणारा मार्ग. स. ११.१५ वा. स्वच्छ वारी निर्मल वारी कार्यक्रमाचे समारोप स्थळ पंचायत समिती पंढरपूर त्यानंतर सकाळी ११.३० वा. शासकीय वाहनाने बारामतीकडे प्रयाण करणार आहेत.



## पारोळ्यातील चिखलाने दिंडीही परत फिरवली

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

पारोळ्यातील बाजारपेठेत जिकडे तिकडे चिखलाचे साम्राज्य पसरले असून आज या चिखलामुळे एन ई एस गर्ल हॉयस्कुलच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त काढण्यात आलेली विद्यार्थ्यांनींची वृक्ष दिंडी ही परत फिरवली. या दिंडी सोबत असलेले शिक्षक सचिन पाटील यांना दिंडी का फिरवली असे नागरिकांनी विचारले असता त्यांनी सांगितले यापुढे इतका चिखल आहे, कि एकद्या विध्यार्थ्यांनीचा पाय घसरून पडल्याने अपघात होऊ शकतो म्हणून जोखीम न पत्करता आम्ही दिंडी अर्ध्यातुनच फिरवली. याबाबत अधिक माहिती अशी की पारोळा बाजारपेठेत अनेक दिवसांपासून अनेक ठिकाणी चिखलच चिखल झाले आहे यासाठी बाजारपेठेतील व्यापार्यांनी अनेक वेळा नगर परिषदेच्या प्रशासनास अर्ज दिले व समक्ष भेटून सुध्दा या समस्येवर चर्चा केली परंतु आज उद्या करत बाजारपेठेतील ही जटील समस्या काही केल्या मार्गी लागत नाही.



तरी नगरपरिषदेच्या अधिकार्यांनी याची त्वरित दखल घ्यावी तसेच बाजारपेठेतील एकमेव स्वच्छता गृहात अनेक दिवसांपासून स्ट्रीट लाईटची मागणी करण्यात येत आहे. परंतु याकडे प्रशासन डोळे झाक करीत असल्याचे सांगण्यात आले. यामुळे व्यापार्यांसह नागरिकांनी रोष व्यक्त करीत सांगितले की या मागणीची त्वरित दखल घ्यावी अन्यथा जन आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या नागरिकांच्या मागणीसाठी मागणीचा बाजारपेठेतील व्यापार्यांसह नागरिकांनी एक होऊन लढा उभारावा असे आवाहन पारोळा व्यापारी असोसिएशन भाजीपाला मार्केट कमिटी, किरकोळ विक्रेते,

पान २ वर »

## 'मी आजही राजीनामा द्यायला तयार'

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न-नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीवर छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली. राज्यात मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर राजकारण तापत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरुन दोन्ही समाज एकमेकांच्या समोर उभा ठाकला जाताना दिसतोय.



त्यामुळे वातावरण शांत व्हावं या उद्देशाने आपण शरद पवारांची भेट घेतल्याची माहिती छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी भुजबळांनी "मी आजही राजीनामा द्यायला तयार आहे", असं मोठं वक्तव्य केलं. "गरीब दोन्ही समाजात आहेत. त्यात काही लोक संभ्रम निर्माण करत आहेत. लग्नात जायचे नाही, हॉटेलात जायचे नाही, हे कधी थांबणार? यासाठी मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली. हे थांबले पाहिजे यसाठी मी पुढाकार घेतला. शरद पवारांनी हे पाहिलं आहे. त्यामुळे त्यांना माहिती आहे. शरद पवारांना अनुभव जास्त आहे. राज्यात शांतता निर्माण होण्यासाठी शरद पवारांची मदत घेतली तर काय हरकत आहे?", असा सवाल छगन भुजबळ यांनी केला. "राज्यात कटुता वाढत आहे. ती शांत राहिली पाहिजे. पटविण्याला

पान २ वर »

## लाडकी बहीण योजनेचे जिल्ह्यात दीड लाखावर नोंदी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्याने नेहमीच विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आघाडी घेतली असून 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना' ही तर जिल्ह्यातील महिलांच्या सक्षमीकरणाची चळवळ असून आता पर्यंत दीड लाख नोंदी झाल्या आहेत. सदर योजना यशस्वीतेसाठी आपण प्रत्येक तालुकास्तरावर याचा आढावा घेणार असून जिल्ह्यातील सुमारे



सहा - सात लाख पात्र भगिनींना राखी पौर्णिमेला ओवाळणी मिळेल असा प्रयत्न करण्याचे आवाहन करून मुख्यमंत्र्यांच्या या महत्वाकांक्षी योजनेत जिल्हा अग्रेसर राहण्यासाठी मिशन मोडवर राबवा असे निर्देश पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. तर या योजनेच्या नोंदणीसाठी शहरात वॉर्डनिहाय नियोजन करण्याच्या सूचना मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी दिल्या. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी बैठकीच्या सुरुवातीला या योजनेचे सादरीकरण केले. त्यात या योजनेविषयी सविस्तर माहिती दिली.


पान २ वर »

## पक्षाने टिकीट दिले अथवा नाही दिले तरी आमदारकी लढविणारच

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** वृत्तसंस्था

पाचोरा विधानसभा मतदार संघात गेल्या ६७ वर्षापासुन वाघ कुटुंबिय राजकारणात असुन कार्यकर्त्यांची निवडणुक असो की, विधानसभेची सर्वच निवडणुकीत सक्रिय सहभाग घेतला आहे. स्व. औंकार आप्पांच्या काळापासुन ते आजपर्यंत १९७२ ची निवडणुक वगळता एकही विधानसभेची निवडणुक आमच्या कुटुंबाशिवाय पार पडली नाही. सध्या मतदार संघात अफवांना ऊत आला असुन येणारी विधानसभा निवडणुक दिलीप ओंकार वाघ तिकिट असो किंवा नसो लढणार म्हणजे लढणारच अशी माहीती माजी आमदार दिलीप वाघ यांनी त्यांच्या गावी बांबरूड (राणीचे) येथे पत्रकार परिषद घेउन दिली.

माजी आमदार दिलीप वाघ यांनी त्यांचे मुळगाव बांबरूड राणीचे येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलतांना दिलीप वाघ म्हणाले की, विधिनसभा व लोकसभा या निवडणुका सामान्य जनतेशी निगडित असल्याने ही निवडणुक जनता हातात घेते. सध्यास्थितीला राजकारण हे कार्पोरेट (कंपन्यांच्या)



आधारावर होत असुन अशा राजकारणात सामान्य जनतेला किंमत असेल काय ? असा प्रश्न निर्माण होतो. यामुळे सामान्य परिस्थीतीच्या व लोकसेवेच्या भावनेने काम करणार्या कार्यकर्त्यांनी राजकारणात यायचे किंवा नाही ? हा प्रश्न पुढे येतो. यापेक्षा सामान्य जनता व कार्यकर्ते यांच्या दैनंदिन प्रश्नांना प्राधान्य व वेळ देण्यापेक्षा वयक्तिक हेवेदावे, सुडभावना यामुळे राजकारणाचा घसरणारा स्थर याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पैशातुन सत्ता, सत्तेतुन पैसा या आर्थिक मुल्यमापनाच्या गणितातुन लोकसेवेची भावना लुप्त होत आहे ती वाचवणे गरजेचे आहे. सध्या जनमानसातुन नेता निवडीची घोषणा होण्या ऐवजी वरिष्ठ पातळिवरून संपत्तीच्या आधारावर तिकीटांची घोषणा केली

पान २ वर »

## शिक्षणाद्वारे स्वस्थ व सुसंस्कृत समाज निर्मितीचे आव्हान

### गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे शिक्षणासमोरील आव्हाने विषयावर चर्चासत्रांत मान्यवरांचा सूर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

मुलांचे भविष्य घडविण्याच्या प्रयत्नात त्यांचे वर्तमानातील बालपण आपण हरवित आहोत. सामाजिकस्तरावर स्थैर्य न ठेवता सरकार, समाज आणि शिक्षणातील बाजारीकरणामुळे सर्वच जण अस्वस्थ आहेत. शिक्षक, विद्यार्थी, संस्थाचालक, पालक सर्वच जण वैचारिकदृष्ट्या तणावात आहेत. त्यामुळे शिक्षणाकडे फक्त नोकरी, व्यवसाय किंवा उत्पन्नाचे साधन म्हणून न पाहता चारित्र्यशील आणि कुशल समाजाची निर्मितीचे साधन म्हणून शिक्षणाकडे बघितले पाहिजे.




शिक्षणाद्वारे स्वस्थ व सुसंस्कृत समाज निर्मितीचे आव्हान आपल्या समोर असल्याचा सूर उमटला. त्यावर उपाय हा की, प्रत्येकाची जबाबदारी वाढली आहे त्यादृष्टीने ज्यानेत्याने महत्त्वाची भूमिका निभवावी, असे विचार गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या 'भारत में शिक्षा की चुनौतियाँ' या विषयावरील चर्चासत्रात मान्यवरांनी व्यक्त केले. गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या कस्तूरबा सभागृहात झालेल्या चर्चासत्रात तरुण शांती सेनेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष अशोक भार्गव, गुजरात इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्चचे माजी संचालक डॉ. लीला वसारिया, सेंटर ऑफ एक्सलन्स इन टीचर एज्युकेशनचे व्याख्याता डॉ. विकास मणियार व हॅडलबर्ग

**आज डॉ. प्रभा रवि शंकर यांचे व्याख्यान**

गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे कस्तूरबा सभागृह येथे आज दि. १८ जुलै रोजी संध्याकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान डॉ. प्रभा रवि शंकर यांचे व्याख्यान आजोजित केले आहे. महादेवभाई देसाई एक परिपूर्ण स्वीय सहाय्यक या विषयावर ते मार्गदर्शन करतील. महादेवभाई देसाई हे महात्मा गांधींचे स्वीय सचिव आणि जवळचे मदतनीस होते. १९१७ ते १९४२ अशी २५ वर्षे त्यांनी महात्मा गांधीजींची समर्पित सेवा केली. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. डॉ. प्रभा रवि शंकर या योगदानाविषयी आणि त्यांच्या आयुष्यातील बारीकसारीक पैलूंविषयी भाष्य करतील. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक अशोक जैन यांनी केले.

विद्यापीठ जर्मनीच्या माजी इतिहास विभाग प्रमुख डॉ. गीता धर्मपाल सहभागी झालेत. चर्चासत्राचे संचालन गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुदर्शन अयंगार यांनी केले. शहरातील संस्थाचालक, शिक्षक, विद्यार्थी, पालकांनी खुल्या चर्चासत्रात प्रश्नोत्तराद्वारे सहभाग घेतला. डॉ. लीला वसारिया यांनी मुलींचे शिक्षण व रोजगाराची निर्मितीतील त्यांचे स्थान यावर भाष्य केले. २१ ते २८ वयोगटातील मुलींना रोजगाराच्या दृष्टीने शिक्षण मिळत नाही आणि शिक्षण मिळाले तरी कौटुंबिक जबाबदारांमुळे त्याचा उपयोग पाहिजे तेवढा करता येत नाही. अशोक भार्गव यांनी सांगितले की, मुलं हे नैसर्गिकदृष्ट्या शिकतात. त्यांचा मेंदू हा प्रत्येक गोष्ट आत्मसात करत असतो. परंतु बालपणातच आपण त्यांच्यातील कुतुहल, प्रयोगशीलता, सृजनशिलता ह्या तीन गोष्टी हिरावून घेतो. त्यामुळे अवघा दोन टक्के समाज हा

पान २ वर »

मुकेश ऊर्फ बाबाजी मुरलीधर पाटील
यांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!





लोकप्रिय आमदार मंगेशदादा चव्हाण

....शुभेच्छूक...
माननीय दादासाहेब मंगेश चव्हाण आमदा, चाळीसगाव
सौ.उषाबाई मुरलीधर पाटील (आई वडील)

| | |
|---|---|
| श्री नानासाहेब रमेश चव्हाण | श्री. व्यंकटराव दौलतराव बच्छाव |
| श्री.ललितकुमार मुरलीधर पाटील (भाऊ) | सौ.गायत्री ललित कुमार पाटील (वहीणी) |
| श्री.शशिकांत मुरलीधर पाटील (भाऊ) | सौ.माधुरी शशिकांत पाटील ( वहिनी) |
| श्री.राहुल मुरलीधर पाटील (भाऊ) | सौ.सुजाता राहुल पाटील (वहिनी) |
| सौ. प्रगती मुकेश पाटील पत्नी | प्रियश मुकेश पाटील (मुलगा) |
| श्री.जनार्दन भगवंतराव पवार (सासरे) | प्रेम जनार्दन पवार (शालक) |

सर्व काका काकू ,भाऊ वहिनी , बाल गोपाळ मंडळी

सोनवणे परिवार वाकडी चाळीसगाव नाशिक